लोकमत

# सांगलीतील पेपरफुटी : दोन दिवसांत दोषींवर कारवाई

## प्राचार्यांसह १२ जणांची कसून चौकशी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** बी. एस्सी. भाग तीनच्या सहाव्या सत्रातील 'फिजिकल केमिस्ट्री' विषयाच्या प्रश्नपत्रिकेची (पेपर) वेळेपूर्वी प्रिंट काढण्याचा (पेपरफुटी) प्रकार गेल्या आठवड्यात सांगली जिल्ह्यातील कुंडल येथील महाविद्यालयात घडला. याप्रकरणी प्राचार्य, कर्मचारी, पर्यवेक्षक, विद्यार्थी अशा एकूण १२ जणांची शिवाजी विद्यापीठातील परीक्षा प्रमाद समितीने गुरुवारी सुमारे चार तास कसून चौकशी केली. ही समिती चौकशीचा अहवाल दोन दिवसात विद्यापीठाला सादर करणार आहे.

कुंडलमध्ये पेपरफुटीचा प्रकार घडला, तर रेठरे (ता. कऱ्हाड) येथील कृष्णा महाविद्यालयात या पेपरला गैरप्रकार (कॉपी) करताना चार विद्यार्थी विद्यापीठाच्या भरारी पथकाला सापडले. पेपरफुटीचा प्रकार घडलेल्या महाविद्यालयातील प्राथमिक

### सीसीटीव्ही फुटेजची पाहणी

कुंडल येथील महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी पेपरफुटी दिवशीचे सीसीटीव्ही फुटेज आणि प्राथमिक चौकशीचा अहवाल विद्यापीठाला सादर केला होता. त्याची पाहणी परीक्षा प्रमाद समितीने केली.

चौकशीत शिपाई आणि लॅब अस्टिटंट दोषी आढळले. त्यांच्यासह प्राचार्य, दोन पर्यवेक्षक (अंतर्गत आणि बाह्य), एसआरपीडी कक्षाच्या समन्वयकाची आणि रेठरे येथील महाविद्यालयात कॉपी करताना सापडलेले चार विद्यार्थी आणि तेथील दोन पर्यवेक्षकांची परीक्षा प्रमाद समितीने गुरुवारी दुपारी २.३० वाजता चौकशी सुरू केली.

29 JUL 2022 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तबबल २२६ विषयांच्या परीक्षा पूर्ण

## शिवाजी विद्यापीठ; व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठाच्या ७४१ अभ्यासक्रमांच्या परीक्षांपैकी २२६ विषयांच्या परीक्षा पूर्ण झाल्या. ५ हजार २२६ विद्यार्थी प्रविष्ट होते. झालेल्या परीक्षेपैकी ६६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. बहुतांशी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू असून या आठ दिवसात त्या पूर्ण होतील.

उन्हाळी परीक्षांना १९ जुलैला प्रारंभ झाला. बहुपर्यायी प्रश्नपत्रिकेच्या आधारे परीक्षा घेण्याचा निर्णय अचानक घेतल्याने परीक्षांना एक महिना उशीर झाला. पेपरफुटीचा एक प्रकार सोडल्यास सर्व परीक्षा सुरळीत झाली. अद्याप काही परीक्षा होणे बाकी आहे. ज्या विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षणासाठी प्रवेश परीक्षा आणि मुलाखत द्यायची आहे. त्यांच्या सोयीसाठी परीक्षा दोन टप्प्यात घेण्याचा निर्णय झाला. आज २२६ विषयांच्या परीक्षा पार पडल्या. ५ हजार २२६ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. यामध्ये बी.एस.सी, बी.एस.सी फूड सायन्स, बी.एस.सी बायोटेक्नॉलॉजी, बी.एस.सी शुगर टेक्नॉलॉजी, बी.एस.सी पर्यावरणशास्त्र, बी.एस.सी कॉम्प्युटर, एम.एस.सी टेक्नॉलजी, बी.कॉम. बी.कॉम (आय.टी), बी.ए. बी.ए (डिफेन्स स्टडी), एम.कॉम, बी.टेक, बी. फार्म, एम.फार्म, एम.बी.ए, एम.ए (भुगोल), बी.ई, बी,एड, बी.सी.ए, एम.एस.सी, एल.एल.बी, एल.एम.एम, बीई (आर्किटेक्ट), एम.एस.डब्ल्यू, बी.एस.डब्ल्यू, बी.कॉम, (बँक ॲग्रीकल्चर) या अभ्यासक्रमांची परीक्षा झाली.

### ऑनस्क्रीन पेपर तपासणी

विद्यार्थ्यांची उत्तरपत्रिका संगणकावर स्कॅन करण्यात येते. त्यानंतर सॉफ्टवेअरच्या मदतीने ही उत्तरपत्रिका तपासली जाते. बहुपर्यायी स्वरुपाची प्रश्नपत्रिका, उत्तरपत्रिका असल्याने यंदा निकाल वेळेत लागतील असा अंदाज आहे. त्यामुळे पुढील शैक्षणिक वर्षही वेळेत सुरू होईल.



सकाळ

# पेपरफुटी प्रकरणी १२ जणांची चौकशी

## प्रमाद समिती दोन दिवसांत देणार अहवाल

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षेतील पेपरफुटी प्रकरणी आज १२ जणांची चौकशी झाली. सुमारे ४ तास ही चौकशी चालली. परीक्षा प्रमाद समितीने त्यांच्याकडे चौकशी केली असून पुढील २ दिवसात याचा विस्तृत अहवाल समिती विद्यापीठाला सादर करेल. त्यानंतर दोषींवर कारवाई केली जाईल.

विद्यापीठाच्या बीएससी फिजिकल केमेस्ट्री या विषयाचा पेपर परीक्षेआधीच फुटला होता. सांगली जिल्ह्यातील कुंडल येथील परीक्षा केंद्रावर भरारी पथकाने ही बाब उघडकीस आणली. त्यामुळे त्या दिवशी पेपर रद्द करण्यात आला. त्यानंतर चार दिवसांनी या विषयाची परीक्षा झाली. महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी पेपर फोडला असल्याचा संशय असून याची चौकशी सुरू आहे. आज दोन महाविद्यालयातील १२ जणांची चौकशी प्रमाद समितीच्या सदस्यांनी केली. यामध्ये प्राचार्य, शिपाई, पर्यवेक्षक, कर्मचारी यांचा समावेश होता. महाविद्यालयाचे सीसीटीव्ही फुटेजही समितीने तपासले आहे. चौकशीनंतर पुढील दोन दिवसात याचा विस्तृत अहवाल प्रमाद समिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाला सादर करेल. त्यानंतर दोषींवर कारवाई केली जाईल.

2 9 JUL 2022
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : रसायनशास्त्र अधिविभागातील कोर्समधील सहभागी विद्यार्थ्यांबरोबर मान्यवर.

# रसायनशास्त्रामध्ये व्हॅल्यू ॲडेड कोर्सला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागात डीएसटी पर्स योजनेंतर्गत आयोजित सातदिवसीय व्हॅल्यू ॲडेड कोर्समध्ये रसायनशास्त्र अधिविभागातील ३२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या उपक्रमात डॉ. सुशीलकुमार जाधव, डॉ. डी. एस. दगडे, डॉ. ए.व्ही. घुले, डॉ. डी. एस. भांगे, डॉ. डी. एम. पोरे, डॉ. एस. डी. डेलेकर, डॉ. भोसले, डॉ. संकपाळ, डॉ. गरडकर यांनी सहभागी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

एक्सआरडी, आयआर-स्पेक्ट्रोस्कोपी, टीजीए-डीटीए, युव्ही-व्हीजीबल, एसईएम, टीईएम, जीसीएमएस, आयसीपी-ओइएस, एनएमआर स्पेक्ट्रोस्कोपी, बीईटी सरफेस एरिया मेजरमेंट, पार्टिकल साईझ एनालायझर इत्यादी संशोधनासाठी अत्यंत महत्त्वाच्या उपकरणांचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले. प्रशिक्षणासाठी डॉ. प्रा. आर. जी. सोनकवडे, प्रा. राजपुरे व सचिन कलश यांचे सहकार्य लाभले. डॉ. एस. ए. संकपाळ यांनी समन्वयक म्हणून काम पाहिले. समारोप समारंभास डॉ. आर. जी. सोनकवडे प्रमुख पाहुणे तर अध्यक्ष म्हणून रसायनशास्त्र अधिविभागाचे अधिविभाग प्रमुख डॉ. के. डी. सोनवणे उपस्थित होते.



# विद्यापीठातील एनएसएसचे कार्य आदर्शवत

## केंद्रीय युवा व क्रीडा मंत्रालयाचे सहाय्यक सचिव जयंत किशोर यांचे कौतुकोद्गार



कोल्हापूर : जयंत किशोर यांना ग्रंथभेट व स्मृतिचिन्ह देऊन स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, अभय जायभाये व डॉ. संजय ढिगळे.

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्य समाजाभिमुख आणि आदर्शवत स्वरुपाचे आहे, असे कौतुकोद्गार केंद्रीय युवा व क्रीडा मंत्रालयाचे सहाय्यक सचिव जयंत किशोर (आय.ए.एस.) यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना (एन.एस.एस.) विभागास किशोर यांनी भेट देऊन योजनेच्या विद्यापीठ आणि महाविद्यालयीन स्तरावरील कामकाजाची माहिती घेतली. त्यानिमित्ताने राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभागी स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी यांच्यासमवेत आयोजित संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सचिव किशोर म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजनेशी निगडित घटकांसाठी शासकीय स्तरावर आणखी धोरणात्मक योजना आखण्याचा मनोदय आहे. शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्याचे कौतुक करून समाधान व्यक्त केले. स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी यांच्याशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्याशी सचिव किशोर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या उपक्रमांबाबत चर्चा केली. त्यानंतर विद्यापीठातील व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विभागांना भेटी दिल्या.

अध्यक्षस्थानावरून प्रभारी कुलसचिव डॉ शिंदे म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजना ही स्वयंसेवकांच्या तनामनामध्ये रुजलेली असते, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक अभय जायभाये यांनी प्रास्ताविक केले. प्रा. संदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. पोपटराव माळी यांनी आभार मानले.